**CNR : MHGA08-000136-2019**

**सं.फौ.ख.क.४१/२०१९**
**शासन—वि—प्रशांत राउत**
**निशाणी कमांक १६**

सरकार तर्फे साक्षीदार कमांक १ याची शपथेवर साक्ष
मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव :— श्री अजय बापू आत्राम,
माझे वय :— ३२ वर्षे, धंदा :— मजूरी,
राहणार :— व्यंकटापूर, ता. सिरोंचा, जि. गडचिरोली.

सरतपास : श्री आर.एस.उंदिरवाडे, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता— गैरहजर

कोर्टात हजर असलेल्या आरोपीला मी ओळखतो, कारण पोलिसांनी मला बोरमपल्ली फाटा येथे बोलाविले होते आणि मी आरोपीला त्या ठिकाणी पाहिले होते. दिनांक ०७/०३/२०१९ रोजी पोलिसांनी मला मौजा बोरमपल्ली फाटा येथे बोलाविले. त्यानंतर, पोलिसांनी माझेसमक्ष पंचनामा तयार केला. मला आता घ टनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला असुन, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. घटनास्थळ पंचनामा **नि.क.१७** वर आहे. मला आता गुन्हयाचा तपशिल नमुना दाखविण्यात आला असुन, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. गुन्हयाचा तपशिल नमुना **नि.क.१८** वर आहे. पोलिसांनी माझेसमक्ष एका कारमधून ४० बाबुलचे डब्बे जप्त केले होते.

**उलटतपासणी : आरोपीतर्फे ॲड.श्री टी.जे. कोंडागोर्ला :**

हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला यापूर्वी कधीही पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी कोणाच्या मालकीच्या गाडीमधून बाबुलचे डब्बे जप्त केले हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझेसमक्ष बाबुलचे डब्बे जप्त केले किंवा इतर वस्तु जप्त केल्या हे मला माहिती नाही. नि.क.१७ वरील घटनास्थळ पंचनाम्यामध्ये बाबुलचे डब्बे जप्त केल्याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला पोलिस स्टेशनमध्ये बोलाविले. हे म्हणणे खरे नाही की, पोलिस स्टेशनमध्ये पोलिसांनी घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनामा व गुन्हयाचा तपशिल नमुन्यामध्ये काय लिहले आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबाबत काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी संपली.**

**फेरतपासणी काही नाही.**

| | |
|---|---|
| **वा.दा.ब.अ.क.केले** | **माझे समक्ष** |
| स्वा/— | स्वा/— |
| **(डी.डी.फुलझेले)** | **(डी.डी.फुलझेले)** |
| न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सिरोंचा. | न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सिरोंचा. |
| | दिनांक ०५.०९.२०१९ |